॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २१ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राअंतर्गत मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या निमित्ताने दि.१७ जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यांचे कवी संमेलन पार पडले. या कार्यक्रमासाठी भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक माननीय प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

या कार्यक्रमात प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी मराठी साहित्यात नावाजलेल्या कवींच्या कवितांसोबत स्वलिखित कवितांचे सादरीकरण केले. यात प्रथम वर्ष मराठीचा विद्यार्थी स्वप्निल जाधव याने कवी अनंत राऊत यांच्या 'बा भीमा' आणि 'मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा' या कवितांना गेय स्वर देऊन प्रभावीपणे सादरीकरण केले. द्वितीय वर्ष हिंदी विषयाची विद्यार्थिनी अनुष्का पवार हिने 'ईश्वराची दया' ही कविता सादर केली. एम. ए. द्वितीय वर्ष इंग्रजीचा विद्यार्थी

योगेश पाटोळे याने अविनाश भारती यांची 'चुडा' तसेच स्वरचित 'भीमा' नावाची कविता सादर केली. एम. ए. प्रथम वर्ष मराठीचा विद्यार्थी विठ्ठल कांडेलकर याने सुरेश भट यांची 'विझलो जरी आज मी' या कवितेचे सादरीकरण केले. एम. ए. द्वितीय वर्ष मराठीचा विद्यार्थी अर्जुन पावरा याने मंगेश पाडगावकर यांची तारुण्यातील पोरांच्या भावना अभिव्यक्त करणारी 'मी कुठे म्हणालो परी मिळावी' ही कविता सादर केली. या कार्यक्रमात भाषा अभ्यास प्रशाळे बाहेरील विद्यार्थ्यांनी सुद्धा सहभाग घेऊन कविता सादर केल्या. यात भौतिकशास्त्र विभागातील सुनिता महेराळे या विद्यार्थिनीने पु. ल. देशपांडे यांची 'मैत्री' ही कविता सादर केली. तसेच या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबतच भाषा अभ्यास प्रशाळेतील शिक्षकांनी सुद्धा सहभाग घेत कवितांचे सादरीकरण केले.

अशा कार्यक्रमांच्या प्रयोजनामगील भूमिका स्पष्ट करताना अध्यक्षीय मनोगतातून प्रशाळेचे संचालक माननीय प्रा. डॉ. म. सु. पगारे म्हणाले की, विविधांगी पद्धतीने कवितेचा आस्वाद घेता येतो. जसे की कविता ऐकून, कविता सादर करून हा आस्वाद घेता येतो त्यावेळी मिळणारा आनंद अद्‌भुत असतो. त्यामुळे तो स्वतःपुरता न ठेवता विद्यमान वास्तवात पेरला गेला पाहिजे. आजच्या दिवसाची ही गरज आहे. सूर्य पाहणाऱ्यांना तो डोळा भरून पाहता आला पाहिजे. पण सूर्य कसा पाहायचा हे बऱ्याच लोकांना आयुष्यभरही कळत नाही. तसेच कवी संमेलन केवळ एक सोपस्कार म्हणून पार न पाडता त्याचा आस्वाद घेता आला पाहिजे. अशी भूमिका मांडली.

या कार्यक्रमासाठी भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातील मराठी, हिंदी, इंग्रजी या विषयांचे शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा लाम्हणे तर आभार डॉ. दीपक खरात यांनी केले.

### बातमी नं. २

जळगाव (प्रतिनिधी) दि. २१ :-कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा व पीएम उषा अंतर्गत दिनांक २३ व २४ जानेवारी २०२६ रोजी " बोध,मानवी बुद्धिमत्ता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता " (कॉग्निजन ह्यूमन अँड आर्टिफिशियल इंटेलिजंट) या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे . या परिषदेसाठी देश- विदेशातून तज्ञ वक्ते सहभागी होणार आहेत.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात दिनांक २३ रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन होणार आहे .यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नीती आयोगाचे वरिष्ठ सल्लागार व्ही.के. सिंग, विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव प्रा.मनीष जोशी तर बीजभाषक म्हणून मलेशिया येथील आयएनटीआय इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीचे प्र- कुलगुरू खांग वेन गोह उपस्थित राहणार आहेत. तसेच मा. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, विद्यापीठाचे प्र - कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ विनोद पाटील उपस्थित राहणार आहेत.

विद्यापीठात होणाऱ्या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत वेगवेगळया सहा सत्रात आंतरराष्ट्रीयकीर्तीचे वक्ते मार्गदर्शन करणार असून प्राप्त झालेल्या संशोधन पेपर्सचे सादरीकरण ऑनलाइन आणि ऑफलाइन या दोन्ही माध्यमातून होणार आहे. दिनांक २३ रोजी आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनानंतर हैदराबाद विद्यापीठ येथील प्रा. राजीव वनकर, जॉनाथन डूने,जापान येथील प्रा. केनजी डोया मार्गदर्शन करतील. त्यानंतर सायंकाळी .६.३० सांस्कृतिक कार्यक्रम होईल. दुसऱ्या दिवशी दि.२४रोजी जीएसएफसी विद्यापीठ वडोदरा येथील कुलगुरू प्रा. जी. आर. सिन्हा, बिट्स पिलानी हैदराबाद येथील प्रा. परेश सक्सेना, सुरत येथील डॉ. सुनिलकुमार मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी ४ वाजता विद्यापीठाचे प्र - कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रा.प्रा. जी. आर. सिन्हा,

## जनसंपर्क विभाग

मलेशिया येथील आयएनटीआय इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीचे प्र- कुलगुरू खांग वेन , नागपूर येथील आंबेडकर स्कूल ऑफ गव्हर्नमेंट चे संचालक मंगेश दहिवाले यांच्यासह अधिष्ठाता प्रा. एस.एस. राजपूत, प्रा. अनिल डोंगरे, कुलसचिव डॉ विनोद पाटील उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी सर्वोत्कृष्ट सादरीकरण आणि संशोधन पेपर्सला पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती आंतरराष्ट्रीय परिषदेचे मुख्य संयोजक तथा संगणक शास्त्रे प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. राकेश रामटेके यांनी दिली. दोन दिवस होणाऱ्या या आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी व्हावे असे आवाहन संचालक प्रा.. डॉ. राकेश रामटेके, प्रा . एस.आर.कोल्हे,सचिव डॉ. अजय सुरवाडे, समन्वयक डॉ.अजय पाटील, सहसमन्वयक डॉ. राम भावसार यांनी केले आहे.

**आंतरराष्ट्रीय परिषदपूर्व २२ रोजी कार्यशाळा** : त्यापूर्वी दिनांक २२ रोजी आंतरराष्ट्रीय परिषद पूर्व कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून एमकेसीएलचे चीफ मेंटर विवेक सावंत तर प्रमुख अतिथी म्हणून एमकेसीएलचे मुख्य व्यवस्थापक अमित रानडे (पुणे ), सायबर सुरक्षा नाशिकचे तन्मय दीक्षित यांच्यासह प्र - कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील उपस्थित राहणार आहेत. उपस्थितीचे आवाहन संगणकशास्त्रे प्रशाळेचे संचालक प्रा. राकेश रामटेके, निमंत्रक डॉ. संदीप भामरे, समन्वयक प्रा. सुरेंद्र कापसे यांनी केले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ — दिनांक: २१ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता